दैनिक संचार

### आदर्श बँक पुरस्कार प्रदान

# चांगले कर्जदार मिळणे अवघड

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. २६– सहकारी बँकांकडे ठेवी मोठ्या प्रमाणात आहेत, परंतु चांगले कर्जदार मिळणे अवघड झाले आहे, असे प्रतिपादन माजी आमदार सुधाकरपंत परिचारक यांनी केले.

गुरुवारी, शिवस्मारक सभागृहात सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशनच्यावतीने आदर्श बँक व आदर्श मॅनेजर पुरस्कार परिचारक यांच्या हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा उपनिबंधक बी. टी. लावंड हे होते. याप्रसंगी आमदार बबनराव शिंदे, कल्याणराव काळे, राजगोपाल झंवर, यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

प्रास्ताविकात असोसिएशनचे अध्यक्ष राज मिणियार यांनी असोसिएशनच्या कार्याची व पुरस्कार देण्यामागील हेतू विषद केला.

परिचारक पुढे म्हणाले, रिझर्व्ह बँकेचे वेगवेगळे नियम आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या स्पर्धेत सहकारी बँका टिकून राहणे अवघड झाले आहे, अशा कठीण स्थितीतही जिल्ह्यातील सहकारी बँकांचे कामकाज उत्तमपणे चालल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी लावंड म्हणाले, जिल्ह्यात ३४ सहकारी बँका आहेत. एक-दोन बँका सोडल्या तर उर्वरित ३२ बँका चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत. जिल्ह्यातील उत्पादक क्षमता वाढलेली आहे, त्यामुळे ठेवीसुध्दा वाढल्या आहेत.

रिझर्व्ह बँक आणि राज्य शासन यांचे नियम पाळून जिल्ह्यातील सहकारी बँका काटकसरीने चांगल्या पध्दतीने काम करीत असल्यामुळे सर्व सहकारी बँका अभिनंदनास पात्र आहेत.

यावेळी समर्थ सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश थोब्बी यांना आदर्श मॅनेजर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी थोब्बी यांनी सहकारी बँकांमध्ये निकोप स्पर्धा होणे गरजेचे असल्याचे सांगितले. असोसिएशनचे संचालक मोहन दाते यांनी पाहुण्यांचा परिचारक करून दिला.



सोलापूर : नागरी सहकारी बँक्स असोसिएशनतर्फे माजी आमदार सुधाकरपंत परिचारक यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचा आदर्श बँक पुरस्कार स्वीकारताना समर्थ सहकारी बँकेचे अध्यक्ष दिलीप अत्रे. यावेळी बी. टी. लावंड, बबनराव शिंदे, राज मिणियार, राजगोपाल झंवर व अन्य. छाया : नागेश दंतकाळे

## या बँकांना मिळाला पुरस्कार

**आदर्श बँक प्रथम पुरस्कार**

| ठेवी | बँकेचे नाव |
|---|---|
| ५० कोटीपर्यंत | निशीगंधा सहकारी बँक, पंढरपूर |
| ५१ ते १५० कोटीपर्यंत | सांगोला अर्बन को-ऑप. बँक लि., सांगोला |
| १५१ ते ५०० कोटीपर्यंत | लोकमंगल को-ऑप. बँक,सोलापूर |
| ५०० कोटीपेक्षा जास्त | समर्थ सहकारी बँक, सोलापूर |

**आदर्श बँक द्वितीय पुरस्कार विभागून**

| | |
|---|---|
| ५० कोटीपर्यंत | कृषी सेवा अर्बन को-ऑप. बँक कोळे आणि शरद नागरी सहकारी बँक, सोलापूर |
| ५१ ते १५० कोटीपर्यंत | शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँक, बार्शी आणि विद्यानंद को-ऑप. सोलापूर. |
| १५१ ते ५०० कोटीपर्यंत | मनोरमा को-ऑप. बँक, सोलापूर आणि विकास सहकारी बँक, सोलापूर |
| ५०० कोटीपेक्षा जास्त | सोलापूर जनता सहकारी बँक, सोलापूर आणि दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक, पंढरपूर |

**आदर्श बँक तृतीय पुरस्कार**

| | |
|---|---|
| ५० कोटींपर्यंत | सद्गुरू गहिनीनाथ अर्बन को-ऑप. बँक, अकलूज |
| ५१ ते १५० कोटीपर्यंत | माढेश्वरी अर्बन को-ऑप. बँक, माढा |
| १५१ ते ५०० कोटी | दि लक्ष्मी को-ऑप. बँक, सोलापूर |